फुलपाखरू मराठी निबंध

तसं पहिला तर निसर्गात खूप सारे कीटक आहेत. जवळ-जवळ ८ लाखांपेक्षा जास्त प्रजाती आहेत पण त्यातल्या त्यात १ लाख कीटकांवर आतापर्यंत संशोधन झाले आहे. त्यात फुलपाखरू आकर्षक आणि मोहक दिसतात. फुलपाखरे हे जगात सर्वत्र आढळतात. उष्ण प्रदेशात त्यांची संख्या फार जास्त असते. ते वेग वेगळ्या रंगाचे आणि नाजूक असतात. आतापर्यंत जगात दीड लाखाहून अधिक प्रजाती नोंदवल्या गेल्या आहेत. आपल्या भारतात सुमारे १२०० ते १५०० जाती आढळतात. नुक्त्या महाराष्ट्रातच २२५ जाती आहेत. इंग्रजीमध्ये फुलपाखरू ला 'बटरफ्लाय' म्हणून संबोधतात.

तुम्हाला असा प्रश्न नक्की असेल कि याला फुल पाखरू का म्हणतात? बरोबर ना. खर तर त्यांना त्यांच्या पंखा वरून त्यांना नाव पडल आहे ते. कारण त्यांचे पंख हे फुलाच्या पाकळ्यासारखे विविध रंगाचे असतात. फुलपाखरू हे मुख्यतः ३ भागानी बनलेला असत. त्यांचे डोके, छाती आणि पोट. त्यांना एक सोंड सारखा अवयव सुद्धा असतो. त्याने ते द्रव अवस्थेतील पदार्थ शोषून घेण्यास मदत होते. जास्त करून फुलपाखरे हे अन्न म्हणून फुलांमधील रस शोषून घेतात. त्यांचे पंख हे अतिशय नाजूक असतात. एवढ्या वॉटर कलर दिल्या प्रमाणे असतात. त्यांचं पंखांमुळे ते आकर्षक दिसतात.

महाराष्ट्रात जे फुलपाखरू प्रजाती आढळते. एकूण ३३ प्रकारच्या रंग पेक्षा जास्त आहेत. उदारणार्थ वाघाच्या रंगाचे, बिबट्या, ढगाळ, निळसर, चित्ता, तपकिरी अशा ३३ पेक्षा जास्त रंगाचे आहेत. अनेक जातींपैकी एक 'ब्ल्यू मॉर्मन' हि प्रजाती संपूर्ण महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतातील वनात आढळतात. जास्त करून ते पश्चिम घाटात आहेत. मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद या सारख्या शहरात सुद्धा आढळतात. त्यांच्या पंखांची लांबी साधारणतः १५० मिमी. इतकी असते. काही पुलपाखरू तर संपूर्ण काळ्या सारणाचे आहेत. तर काही निर-निराळ्या रंगाचे आहेत. फुलपाखरू हे सतत या फुलावरून त्याफुलावर असे सतत फिरत असतात आणि फुलामधींल रस शोषून घेतात.

तुम्हाला माहित आहे का फुलपाखरे हि त्यांच्या छोट्याश्या पखाने सुद्धा जास्त अंतर पार करू शकतात. जर हजारो फुलपाखरानी एक साथ पंख फडकावले तर जगाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात वादळ येते. हे शास्त्रज्ञांनी शोधून काढले आहे. मग आपण त्यांच्या लहानश्या पंखात किती शक्ती असू शकते याची कल्पना करू शकतो.

महारष्ट्राला २०१५ मध्ये 'महाराष्ट्र राज्य फुलपाखरू' असा दर्जा देण्यात आला आहे. फुलपाखरू हे लगेच लहानाचे मोठे होत नाहीत. त्यांचा आधी लहानश्या अंड्या मधून एखाद्या रेशमी किड्यामध्ये रूपांतर होते. नंतर काही दिवसांनी त्याचे रूपांतर सुंदर अशा फुलपाखरामध्ये होते. तो कीडा पानावरतीच बसतो त्याचे खाद्य म्हणजे रोपाचे पान. ते नंतर हळू हळू वाढतात आणि एवढ्या कोंबडीच्या पिल्ला सारखे कवच तोडून म्हणजेच त्याचे बाहेर चे आवरण फाडून बाहेर फुलपाखरू येते. हे पाहताना खूप आकर्षक वाटते.
फुलपाखरे हे निसर्गात महत्वाचे योगदान देतात. जसं कि परागकण पसरवण्यात मदत करतात. त्याहून पुढे फुलपाखरे हे बाकीच्या कीटकांचे सुद्धा खानं आहे.

कालांतराने फुलपाखरांच्या काही प्रजाती नष्ट होत चला आहेत. त्याचे कारण म्हणजे वाढते प्रदूषण, जंगल तोड किंवा वातावरणात नकारात्मक बदल. आपण याची काळजी घायला हवी. कारण काही फुलपाखरे हि स्वच्छ वातावरणातच राहतात. फुलपाखरे साधारणतः १ किंवा २ आठवडे जगतात. ते निसर्गाचे संतुलन राखण्यास मदत करतात.